

# मेट्रोच्या कामात तानसा पाईपलाईन सुखरूप

**मुंबई :** मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तानसा पाईपलाईनला धक्का न लावता मेट्रो-३ मार्गिकेच्या सहार स्थानकाच्या कामासाठीचे खोदकाम करण्यात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला (एमएमआरसी) मोठे यश मिळाले आहे. एमएमआरसीने अतिशय क्लिष्ट अशा जागेमध्ये काम करताना हे काम पार पाडले आहे. यामुळे एकही दिवस मुंबईचा पाणीपुरवठा बंद न करता हे काम मोठ्या शिताफीने पूर्ण करण्यात आले. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तानसा पाईपलाईनला कुठेही धक्का न लावता अथवा ही वाहिनी न वळवता हे काम पूर्ण करण्यात आल्याने पाणीपुरवठ्यावर कोणताही परिणाम झाला नाही. मेट्रो स्थानकाच्या उभारणीच्या कामादरम्यान बॉटम अप या पद्धतीचा वापर करत हा संपूर्ण पाईपलाईन खालचा खडक पोखरण्यात आला आहे. मुंबईमध्ये आढळणारा ब्लॅक बसाल्ट हा दगड मेट्रोच्या टीमने ओपन कट पद्धतीने पोखरला. मुंबईला अतिशय उच्च दाबाने पाणीपुरवठा करणाऱ्या तानसा पाईपलाईनच्या खालोखाल हे दगड पोखरण्याचे काम करणे हे मुख्य आव्हान या कामादरम्यान होते. सहार स्थानकाचे काम हे येत्या १५ ते १८ महिने पाईपलाईनखाली चालणार आहे. त्यामुळे पाईपलाईनच्या मार्गाला होणताही धक्का न देता आणि योग्य आधार देता हे काम करणे अतिशय आव्हानात्मक होते. पाईपलाईनखालची माती आणि दगड पोखरून काढताना पाईपलाईनची मूळ जागाही हलता कामा नये, हे महत्त्वाचे होते. मात्र प्रत्येक मिनिटाला वापरण्यात आलेली मॉनिटरिंगची पध्दत आणि अद्ययावत मशिनरींचा वापर करत दगड पोखरण्याच्या सगळ्या हालचालींच्या नोंदीमुळेच हे काम एमएमआरसीला शक्य झाले आहे.